पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८

क्रमांक - प्रशा/३/कावि/१००५/२०१५
दिनांक - ३०/०९/२०१५

# निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गातील पदे भरण्याकामी दिनांक २९/०३/२०१५ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली होती. त्यामधील गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात येणा-या (Zone of consideration) पात्र उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी करण्यात आली असून, दि.२६/०६/२०१५ रोजीच्या कर्मचारी निवड समितीने केलेल्या शिफारसीनुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाकरीता ८५ उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर समितीच्या वेळी अनुसुचित जाती प्रतिक्षा प्रवर्गात खेळाडू, अंशकालीन, अनुसुचित जमाती प्रवर्गात सर्वसाधारण प्रतिक्षा अशंकालीन, भटक्या जमाती (क) प्रवर्गात सर्वसाधारण प्रतिक्षा, भटक्या जमाती (ड) व विशेष मागास प्रवर्गात महिला प्रतिक्षा, इतर मागास प्रवर्गात प्रकल्पग्रस्त व खुल्या प्रवर्गात खेळाडू हे समांतर आरक्षण भरण्याकरीता आवश्यक इतके उमेदवार उपलब्ध होत नसल्याने समितीच्या शिफारशीनुसार अनुसुचित जाती खेळाडू, अनुसुचित जमाती सर्वसाधारण, भटक्या जमाती (क) सर्वसाधारण, भटक्या जमाती (ड) महिला, विशेष मागास प्रवर्ग महिला, इतर मागास वर्ग प्रकल्पग्रस्त व खुला खेळाडू उमेदवारांच्या गुणवत्ता यादीतील पुढील उमेदवारांची दिनांक ०९/०७/२०१५ रोजी कागदपत्रे तपासणी केली आहेत.

स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदामधील काही उमेदवारांनी मे.उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली असून सदर याचिकेची पुढील सुनावणी माहे ऑक्टोबरमध्ये होणार असलेने ती सुनावणी झाल्यानंतर सदर उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी तयार करावी अशी दिनांक २१/०९/२०१५ रोजीच्या कर्मचारी निवड समितीने शिफारस केली आहे. त्यामुळे दिनांक ०३/०७/२०१५ रोजी निवेदनाव्दारे दिनांक ०९/०७/२०१५ रोजी कागदपत्रे तपासणीकरीता पाचारण केलेल्या उमेदवारांमधून निवड व प्रतिक्षा यादी वरील उमेदवारांची निवड करुन अलहिदा प्रसिध्द करण्यात येईल.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८